**निशाणी क्र.१५ वरील आदेशानुसार प्राथमिक मुद्दयावर पुरावा.**
**वादी नामे सुभाष मच्छींद्र औटी यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. पी.व्ही.अंबाडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

१. माझे इयत्ता ७वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. सही मी इंग्रजीमध्ये करतो. गट क्र. ३९४/२६ यामधील दोन एकर क्षेत्र माझ्या ताब्यात आहे. उर्वरीत क्षेत्र प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. प्रतिवादी क्र.१ च्या नावावर क्षेत्र साधारण सात ते आठ वर्षापासुन आहे. आम्हाला पैशाची गरज होती, म्हणुन आम्ही ते क्षेत्र प्रतिवादी क्र.१ ला दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र.१२४२४ अन्वये प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद उता–यास झाली. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा पासुन प्रतिवादी क्र.१ त्या जमीनीमध्ये पिके घेत आहे. प्रस्तुत दावा मी गट क्र.३९४/२५ व गट क्र.३९४/२६ या दोन्ही गटातील क्षेत्रासंदर्भात दाखल केलेला आहे. गट क्र.३९४/२५ याचे क्षेत्र किती आहे, हे मला सांगता येणार नाही. तसेच त्या गटाच्या चतु:सिमा मला सांगता येणार नाहीत. गट क्र.३९४/२५ हा माझ्या मालकीचा आहे.

२. गट क्र.३९४/२६ चे क्षेत्र तीन एकर आहे. त्या गटाचा उतारा मी पाहिलेला आहे. त्या उता–यावर प्रतिवादी क्र.१ चे नाव आहे. गट क्र.३९४/२६ च्या पश्चिमेस – रस्ता, उत्तरेस –पानसरे यांचे क्षेत्र, दक्षिणेस – ३९४ असे आहे. गट क्र.३९४ हा एकुण पाच एकराचा असुन ते पुर्ण क्षेत्र माझे आहे.

प्रश्न – दावा तुम्ही पाच एकरासाठी का केला नाही?

उत्तर – त्यापैकी दोन एकर माझ्या नावावर आहे.

३. ते दोन एकर क्षेत्र गटामध्ये पश्चिम बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, उर्वरीत पुर्वेकडील तीन एकर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ च्या नावावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या क्षेत्रास सन २०११ पासुन प्रतिवादी क्र.१ च्या नावाची नोंद आहे. ते क्षेत्र माझ्या ताब्यात असल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा आहे. तो पुरावा मी पुढील तारेखस दाखल करण्यास तयार आहे.

**कागदपत्र दाखल करण्यासाठी पुढील तारखेपर्यंत साक्ष तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकती.**

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.07.10 14:49:40 +0530

(**श्रीमती संध्या यु. सुळ**)

दिनांक–१०/०७/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

नेवासा